वर्ष ४१ अंक १

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जानेवारी २०२१

## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

"जाणाऱ्या माणसाला
बरोबर काहीच नेता येत नाही
हे खरे आहे
खरे नाही त्याचे सारे मागे ठेवणे
आणि एकट्याने अगदी रिकामे निघूनणे...
जाताना आपल्या अदृश्य हातांनी
उचलतो तो कधी आपल्या जीवलगांची नीज
उचलतो कुणाची स्वस्थता
सहज ओढून नेतो जीवनाचे दिलासे आणि
संघर्षाचे धैर्य
पायांखालच्या जमिनीचा
विश्वासच कधी हिरावतो कायमकरता"

अरुणा ढेरेंच्या या ओळी आज सारख्या आठवताहेत. खरंतर अनेक अर्थांनी अस्वस्थ करणारं हे वर्ष. जाताजाताही मन सुन्न करणारी बातमी देऊन गेलं ती म्हणजे डॉ. शीतल आमटेंच्या अकाली जाण्याची. एवढ्या प्रथितयश व्यक्तींच्याही मनात असं काय चाललं असेल ज्यामुळे एवढं टोकाचं पाऊल उचलण्याची वेळ यावी.असे अनेक अनुत्तरीत प्रश्न त्या सोडून गेल्या आहेत. शेवटी मनाचा थांग लागत नाही हेच खरं. शास्त्र कितीही पुढे गेलं तरी एखाद्याच्या मनाची घुसमट मोजण्याचं मापक काही अजून कोणाला सापडलं नाहीय. 'संवाद' हाच त्यावरचा उपाय असावा कदाचित. पण शेवटी "Show must go on!" जुन्या वर्षाचे सगळे हे कडूगोड अनुभव विसरून नव्या वर्षाचं मनापासून स्वागत करूया.

यावर्षीही बृहन्महाराष्ट्र मंडळाचे (बृ. म. मंडळ/BMM) अनेक अभिनव उपक्रम तेवढ्याच उत्साहाने आपली वाट बघताहेत. या वर्षाची सुरुवातच एका मंगलमय उपक्रमाने होते आहे, ती म्हणजे २७ डिसेंबरला BMMची उत्तर अमेरिकेतील वधूवरसूचक वेबसाईट reshimgathee.bmmonline.org खुली झाली आहे. आपल्या घरात कोणी लग्नाळू मुलेमुली असतील तर लगेच या संकेतस्थळाला भेट द्या आणि त्यांची नावे नोंदवा. इतर उपक्रमांप्रमाणेच याही उपक्रमाला आपण भरघोस प्रतिसाद द्याल ही खात्री आहे. 'BMM North America Program'ला खूप चांगला प्रतिसाद मिळतो आहे. १९ डिसेंबरला बृ. म. मंडळ आणि लॉस एंजेलीसच्या मराठी मंडळाने, स्थानिक मराठी नाटकांचा ऑनलाईन प्लॅटफॉर्म वापरून 'चोर आले पाहिजेत' आणि 'माया' या दोन एकांकिका सादर केल्या. त्यांना रसिक प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे.

२०२२ साली 'न्यू जर्सी' येथे होणाऱ्या बृ. म. मंडळाच्या अधिवेशनाची तयारी जोरात चालू आहे बरं का! त्यात कोरोनावर लस तयार झाल्याच्या बातम्यांनी सगळ्यांचाच उत्साह दुणावला आहे. हे अधिवेशन याहीवेळी दणक्यात पार पडणार यात शंका नाही!

मंडळी नववर्षाची उत्साही सुरुवात करण्यासाठी आर्या आंबेकरची लाईव्ह कन्सर्ट १६ जानेवारी रोजी थेट भारतातून आपण आयोजित केली आहे. या मैफिलीचे अधिक कार्यक्रम कोणाला आयोजित करायचे असल्यास शिल्पा कुळकर्णी - बृ. म. मं. कार्यक्रम प्रमुख, Shilpa.kulkarni@bmmonline.org (Tel-978-489-9949) आणि विद्या जोशी: बृ. म. मं. अध्यक्ष vidya.joshi@bmmonline.org, (Tel.224-321-2948) यांच्याशी संपर्क साधावा.

सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा ! आणि सर्वांच्या कल्याणासाठी खालील प्रार्थना करूया.

सर्वे भवन्तु सुखिनः | सर्वे सन्तु निरामयः|
सर्वे भद्राणि पश्यन्तु | मा कश्चित दुःख भाग्भवेत्|
कळावे लोभ असावा, आपली नम्र,

- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org

***

## या अंकात...

- बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता २
- दोन सुलट दोन उलट ५
- कविता:- आठवण ६
- लेखक तुमच्या भेटीला ७
- कविता:- वेध प्रकाशाचे
- विश्व मराठी संमेलन २०२१ (ऑनलाईन) - वार्ता
- अमेरिकेतील दिवाळी "२०२०" - किल्ला स्पर्धा ८
- पुस्तक परिचय:- 'मॅग्नोलिया'
- लेख:- 'एक दाता पेरसिमन गाथा' ९
- उत्तररंग १०
- यूट्युब विभाग:- कविता वाचन
- पुरवणी ई विभाग:- ११
  लेख:- मराठी विश्व-क्लब ५५ची वार्षिक हॉलिडे पार्टी
  - चाफा फुलला !
  - पसायदानाचा शतशब्दथरार
- BMM YuvaVani - Newsletter
- राशिभविष्य:- जानेवारी, २०२१

Matrimonial and Business Advertisements

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com
**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175   अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70   अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२०** तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन,
**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...



**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com or newsletter@bmmonline.org
3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503


# मराठी विश्व (न्यूजर्सी) संयोजित बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता

**- प्रशांत कोल्हटकर** (न्यू जर्सी)
**संयोजन-प्रमुख, बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ न्यूजर्सी**



तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

आपणां सर्वांना २०२१ या नवीन वर्षाच्या आगमनाची जेवढी उत्सुकता व आनंद आहे, त्याहून अधिक २०२० वर्ष संपल्याचा आनंद अधिक आहे.

सध्याच्या कोविड महामारीमुळे आपल्या सगळ्यांचे आयुष्य बरेचसे विस्कळीत झाले आहे. मनात इच्छा असूनही आपल्याला आपल्या मित्रपरिवाराबरोबर एकत्र सण साजरा करणे, एकमेकांना भेटणे शक्य नाही. २०२० चं वर्ष संपत आलं आणि दर वर्षीप्रमाणे लोक कामाला सुट्टी देऊन २०२१ हे नवीन वर्षाच्या स्वागताच्या तयारीला लागले. येणारे नवीन वर्ष एक नवीन उमेद, एक नवीन आशा घेऊन येणार आणि आयुष्य पुन्हा सुरळीत होणार असा आशावाद निर्माण झाला आहे. म्हणूनच न्यू जर्सीत एक वेगळीच लगबग जाणवत आहे आणि ती म्हणजे ‘बीएमएम २०२२’ची पूर्वतयारी! मागील २-३ महिन्यांत समितीचे सदस्य आणि स्वयंसेवक यांचा उत्साह व परिश्रमांनी अधिवेशनाच्या तयारीला योग्य आणि सकारात्मक दिशा मिळाली आहे. दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर आम्ही अधिवेशनाची वेबसाईट bmm2022.org जाहीर केली. आणि ‘बीएमएम २०२२’चा स्वागत व्हिडिओ प्रदर्शित केला. यासाठी श्री. **सचिन खेडेकर** यांनी ‘मराठी विश्व’ला आपला आवाज दिला याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. या व्हिडिओच्या संकल्पनेचे श्रेय या अधिवेशनाचे **सह-संयोजक श्री. अमर उऱ्हेकर** यांना जाते. हा व्हिडीओ पाहण्यासाठी Click here or visit:
https://www.youtube.com/watch?v=LFHts0a7Wqg&feature=youtu.be

बृ. म. मं. अधिवेशन २०२२साठी घोषवाक्य आणि प्रतीकचिन्ह स्पर्धासुद्धा **श्री. राज पोफळे** व **सौ. स्नेहल वझे** यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला. अमेरिकेतूनच नव्हे तर इतर देशांतूनही स्पर्धेसाठी प्रवेशिका आल्या. स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार. आपणां सर्वांप्रमाणेच आम्हीदेखील स्पर्धेच्या निकालांची आतुरतेने वाट पाहत आहोत. लवकरच निकाल जाहीर करण्यात येईल. फेसबुकद्वारे जगभरच्या लोकांपर्यंत २०२२ मधील आपल्या अधिवेशनाची माहिती पोहोचवत आहोत.

आपणही https://www.facebook.com/bmm2022nj या फेसबुक पेजला भेट देऊन ‘Like’ करावे ही विनंती.

अधिवेशनात आपणां सर्वांना एक संस्मरणीय अनुभव देण्यासाठी माझी संपूर्ण टीम जोरदार प्रयत्न करीत आहे. अधिवेशनाचे स्थळ/ कन्व्हेंशन सेंटर हा अधिवेशनाच्या आयोजनातील सर्वात महत्वाचा घटक. अगदी प्रतिकूल आणि कठिण परिस्थितीतही,



न्यू जर्सीच्या टीमने गेल्या दोन महिन्यांत तीन वेळा अधिवेशन केंद्रास भेट दिली. **सुविधा व्यवस्थापन प्रमुख श्री. अमोल पुरव** यांच्या सर्जनशील नेतृत्वासह टीमने सुविधेसाठी उत्कृष्ट नियोजन व मांडणी केली. **प्रोग्रामिंगचे प्रमुख श्री. संदीप धरम** यांनी कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यक्रमासाठी ऑडिओ, व्हिज्युअल आणि स्टेजच्या आवश्यकतेची मौल्यवान माहिती गोळा केली. भोजन समितीच्या **प्रमुख सौ. पूजा शिरोडकर** यांनी प्रत्येक दिवसाचे जेवणाचे वेळापत्रक नियोजित केले आणि आवश्यक श्रम अंदाजाची माहिती गोळा करून योजना आखून देण्याचे काम केले.

जेव्हा आपण अधिवेशनाबद्दल विचार करतो तेव्हा भरपूर निधीची गरज असते. आमच्या समितीने निधी उभारणीचे महत्त्वपूर्ण काम सुरू केले आहे. **श्री. विलास सावरगावकर** व **श्री. विहार देशपांडे** यांच्या नेतृत्वाखाली निधी उभारणीच्या कामांना वेग आला आहे. कुटुंब आणि मित्रांमध्ये निधी जमा करण्यासाठी अनेक देणगीदारांनी स्वत: पुढाकार घेतला आहे. आपला मराठी वारसा, संस्कृती आणि अभिमान जपण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन आपल्या नवीन पिढीलाही आपल्या महान संस्कृतीत सहभागी केले पाहिजे. मला खात्री आहे की एकत्रितपणे आपण मिळून हे लक्ष्य साध्य करू. त्यासाठी लागणारी आर्थिक मदत तुम्ही सर्वजण कराल अशी आमची खात्री आहे. अधिवेशनासाठी संभाव्य आणि इच्छुक देणगीदारांनी खालील ईमेल पत्त्यावर संपर्क साधावा. कृपया या अंकातील पान क्रमांक ४वर दिलेले आमचे “Donation Package” पाहावे.

अधिवेशनाच्या **सह-संयोजिका सौ. पुनीत मराठे** आम्हाला अधिवेशनासंबंधित विविध कराराचा आढावा घेण्यासाठी आणि मौल्यवान अभिप्राय देण्यात मदत मदत करत आहेत. त्याचबरोबर, त्यांनी मुख्य अधिवेशनाअगोदरच्या (‘Day 0’) कार्यक्रमांच्या नियोजनाची जबाबदारी स्वीकारली आहे.

**प्रकल्प व्यवस्थापक श्री. मुकुल डाकवाले** सर्व समित्यांमध्ये समन्वय साधण्यास आणि सर्व समित्यांसाठी रोडमॅपची योजना आखण्यात मदत करीत आहेत. आम्हाला आशा आहे, की अधिवेशनात बरेच तरुण आकर्षित होतील आणि त्यांना भारतीय आणि पाश्चात्य संस्कृतीचा समतोल अनुभवायला मिळेल. हे अधिवेशन तरुणांसाठी अविस्मरणीय असावे यासाठी **युवा समितीच्या प्रमुख सौ. नीलम साळवी** काम करीत आहेत. आमच्या समितीला सतत पाठिंबा, मार्गदर्शन व मौल्यवान माहिती देत असल्याबद्दल मी बीएमएम टीम आणि बीएमएमच्या अध्यक्षा **सौ. विद्या जोशी** यांचे आभार मानू इच्छितो.

चला तर मग भेटूया ऑगस्ट ११ते१४, २०२२ दरम्यान अटलांटिक सिटी, न्यू जर्सी मध्ये.
तुम्ही आम्ही मिळून रचू एक नवा इतिहास आणि होऊ एका ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार
Welcome to BMM 2022!

***

**बृहन्महाराष्ट्र वृत्ताचे वाचक, लेखक, जाहिरातदार -सर्वांना नवीन वर्ष २०२१ निमित्त शुभेच्छा !**




## MATRIMONIAL

Looking for a suitable **Var/Husband** for our daughter whose bio-data is as follows:
**Age:** 37; Height: 5 ft 6 inches, Very Fair
**Education**: Ph.D. in Microbiology; (University of Toronto, Toronto, Canada)
**Job:** A well paid job in Toronto with the Government Of Ontario, Canada.
**Languages**: English, Marathi, Hindi
Caste no bar.
**Contact: vinshirodkar@yahoo.ca**
**Phone: 416.222.2273**

## MATRIMONIAL

Looking for a suitable groom for our US born and brought up daughter.
**Age**: 31, **Height**: 5ft 5inches,
Slim, Beautiful, Intelligent.
**Education:** M.D. OB/GYN MIGS from top notch school in USA.
**Expectations:** Groom must be US citizen, Physician/Lawyer/Very highly educated, achieved, well placed professional. Tall, Personable, Handsome, Age 31-35. Caste no bar
**Contact: Email** - 1yesscotty@gmail.com,

# दोन सुलट, दोन उलट

**- विद्युल्लेखा अकलूजकर** (व्हँकूव्हर, कॅनडा)



**'अक्षांशाचे रेखांशाचे,
उभे आडवे गुंफुन धागे'**

वीसशे वीस सालामध्ये दरदिवशी हताश करणाऱ्या दुर्दैवी जिवांच्या बातम्या दाही दिशांतून मनावर कोसळत असताना, वर्ष संपतासंपता जी एक लखलखीत सोनेरी वार्ता कानी आली, ती म्हणजे **रणजीतसिंह महादेव डिसले** या तरुण मराठी माणसास मिळालेल्या जागतिक शिक्षक पुरस्काराबद्दलची! इंग्लंडमधील व्हार्की फौंडेशनने २००७ मधे सुरू केलेला आणि युनेस्कोचा भरपूर सहभाग असलेला हा जागतिक शिक्षक पुरस्कार एव्हाना चांगलाच गाजलेला आहे. या पुरस्कारापासून स्फूर्ती घेऊन ३५ देशात अलिकडे शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार देणे सुरू झाले आहे. यावर्षी कोविडमुळे प्रथमच हा जागतिक पुरस्कारसमारंभ अप्रत्यक्षपणे, केवळ व्हर्चुअल/ऑनलाइन घडला. पण या वर्षी त्यात १४० देशातून १२,००० वर शिक्षकांचा अंतर्भाव होता, त्यातून पहिल्या फेरीत ५० शिक्षकांना निवडले गेले, आणि त्यातले केवळ दहा अंतिम फेरीत पोचले. शेवटी त्या सगळ्यांमधून रणजीतसिंह महादेव डिसले या परितेवाडीच्या शिक्षकाची या वर्षीचा सर्वोत्कृष्ट शिक्षक म्हणून निवड झाली. हा पुरस्कार मिळालेला हा पहिलाच भारतीय! सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील परितेवाडी येथील मुलींच्या प्राथमिक सरकारी शाळेतील हा शिक्षक! तो स्वकर्तृत्वाने आणि विद्यादानातील नि:स्वार्थी कळकळीमुळे जागतिक स्तरावर पोचला! वर्षभराची माझ्या मनाला आलेली मरगळ या बातमीने खरोखरच दूर झाली, आणि जगाच्या भविष्यकाळाबद्दल विझू लागलेली अदम्य आशा पुन्हा एकदा जीव धरू लागली.



बातमी प्रथम समजली ती बीबीसीच्या मराठी चॅनलवरून, वॉट्सॅपमार्गे. चार डिसेंबर, २०२० रोजी लंडन, इंग्लंडमधील नॅचरल हिस्टरी म्युझियम या पुरातन, भव्य वास्तूमधून झालेला हा समारंभ जगातील शिक्षक-विद्यार्थ्यांनी पाहिला. हा पुरस्कार अमेरिकन एक मिलियन डॉलर्सचा आहे. आपल्या घरातून या पुरस्काराचा स्वीकार करताना श्री. रणजीत डिसले याने तिथल्या तिथे एक घोषणा केली, की आपल्या पुरस्कारातील निम्मी रक्कम आपण अंतिम फेरीतील बाकीच्या नऊ शिक्षकांना समप्रमाणात वाटून देत आहोत. या उदार घोषणेने तर सगळेच प्रेक्षक-श्रोते भारावले. या पुरस्काराबद्दल अशी घोषणा आजपर्यंत दुसऱ्या कोणीही केलेली नव्हती. हे त्याने का केले, तर "आम्ही सर्वजण मिळून जगात चांगला बदल घडवून आणू शकतो," या त्याच्या विश्वासामुळे. "एकजण जिंकला, पण दहाजण खूष आहेत!" असे त्याचे स्पष्टीकरण. धन्य तो रणजीत आणि धन्य त्याचे आईबाप आणि शिक्षक.

मुळात 'मराठी शिक्षकाला शिक्षणक्षेत्रातला जागतिक पुरस्कार' एवढ्याच वार्तेनेदेखील आपल्या अभिमानाचा पारा एकदम वर चढतोच. पण महाराष्ट्राच्या एका दुर्गम कोपऱ्यातली, दुष्काळ आणि पूर यांनी गांजलेल्या भागातली, परितेवाडीमधली जिल्हापरिषदेची त्याची मुलींची शाळा, त्यातल्या त्याच्या विद्यार्थिनींना अद्ययावत तंत्रज्ञानाशी जोडणारे त्याचे नवनवीन प्रयोग आणि कर्तृत्व, त्याबद्दल इतर लोकांनी दिलेले निर्वाळे, आणि इतर विडियो, मुलाखती वगैरेंमधून कळणारे त्याचे अन्य तपशील हाती आल्यावर तर त्याच्याबद्दल मनस्वी कौतुक, आदर आणि साश्चर्य अभिमान वाढलाच.

५ ऑगस्ट १९८८ मधे जन्मलेल्या, आणि २००९पासून शिक्षक म्हणून या प्राथमिक शाळेत आलेल्या तरुणाला कमी पगारावर नोकरी, गोठ्याजवळ असलेली, पुरेशा साधनांच्या अभावाने ग्रस्त शाळा, गरीब आईबापांची शाळेत यायला उत्सुक नसलेली मुले, दहाबारा वर्षांच्या असताना उजवल्या जाणाऱ्या, आणि म्हणून एरवीदेखील बहुतांशी अनुपस्थित मुली, अशा अनेक अडथळ्यांमधून वाट काढावी लागली. परंतु विलक्षण सहनशीलता, २१व्या शतकात विद्यार्थ्यांना आणण्याची दुर्दम्य आकांक्षा आणि डोळसपणे तंत्रज्ञानातील नवनवीन सुधारणांचा उपयोग करून घेण्याचे शहाणपण या गुणांमुळे रणजीत याने अक्षरश: शाळेचा, विद्यार्थ्यांचा, आणि आसपासच्या पालकांच्या मनांचादेखील संपूर्ण बदल करून दाखवला. आता तिथल्या मुलींचे अकाली विवाह होत नाहीत, त्या मुलांइतक्याच कौतुकाने शाळेत जातात, इतकेच नाही तर क्यू आर कोड वापरून मोबाइलच्या साह्याने वर्गात शिकलेल्या धड्यांचा घरी सराव करतात. जगातल्या इतर अनेक ठिकाणच्या शालेय विद्यार्थ्यांशी विडियो कॉन्फरन्सच्या माध्यमातून संपर्क साधतात. त्या वियतनाममधील शाळेतल्या मुलींशी इंग्लिशमधून बोलतात, आणि आपल्या मराठीतले वाक्य तिथल्या मुलींकडूनदेखील ऐकतात. त्यांना चौथीच्या अभ्यासक्रमातील जलचर प्राण्यांबद्दलची माहिती घेताना प्रत्यक्ष ऑस्ट्रियातील शिक्षक त्या देशातील पाण्याखालील प्रयोगशाळेबद्दल माहिती पुरवतात, आणि अमेरिकेतील कासवांच्या हॉस्पिटलबद्दलची माहितीसुद्धा त्यांना अमेरिकन अधिकाऱ्यांच्या तोंडून, पण आपल्या शाळेत बसून मोबाइलवरून पाहतां-ऐकता येते. हा एवढा अद्भुत प्रवास आहे, की शिक्षणक्षेत्रात आयुष्य घालवलेल्या माझ्यासारखीला त्याचे अफाट कौतुक वाटते.

तंत्रज्ञानाची मुळात आवड असलेल्या या शिक्षकाने मुलांना शाळा ही आनंदाची, गंमतीची, आणि त्यातून नवनवीन शिकायला मिळण्याच्या संधीची, अशी आवडती वाटण्यासाठी आजवर किती गोष्टी केल्या आहेत! क्यू आर कोडचा वापर करून, त्याने शालेय पुस्तकातील धड्यांना ते चिकटवून देऊन मुलांना घरीदेखील त्यातून गाणी, गोष्टी, प्रश्न वगैरे बघताऐकतां येतील, अशी सोय करून दिली. हाच प्रयोग त्याने आपल्या केंद्रातल्या वीस शाळांमधेही प्रथम राबवला. त्यानंतर बालभारतीला त्याची माहिती पुरवून त्यांनाही तो प्रयोग राबवण्याची स्फूर्ती दिली. आणि आता तर त्याच्यामुळे महाराष्ट्रात सर्वत्रच पहिली ते बारावीची पुस्तके क्यू आर कोडने वापरली जाण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. या त्याच्या यशस्वी

प्रयोगांमुळे मायक्रोसॉफ्ट कंपनीकडून जगातील ३०० इनोव्हेटिव शिक्षकांमधे त्याची गणना केली गेली, आणि तो पुरस्कार आजवर चक्क चार वेळा रणजीतला मिळालेला आहे! जे जे आपणासी ठावे, ते ते दुसऱ्यां सांगावे, शहाणे करून सोडावे, सकळ जन! असे सांगणाऱ्या समर्थ रामदासांचा वारसा चालवणारा हा मराठी सुपुत्र!

एवढा बदल त्याने एका दिवसात केलेला नाही. पण साधेपणाने राहून, आसपासच्या लोकांचे प्रश्न नीट समजावून घेऊन, त्यांच्या कलाने घेतघेत आपले तोडगे त्यांच्या गळीं उतरवण्याचे व्यावहारिक शहाणपण त्याच्याकडे आहे. वाढदिवसाची भेट म्हणून वडिलांकडून मिळालेला लॅपटॉप वापरून त्याने वर्गात मुलींना चांगल्याचांगल्या मूव्ही दाखवून शाळेत येण्याची प्रथम गोडी लावली, आणि त्यांची दैनिक उपस्थिती वाढल्यावर त्यातून हसतखेळत अभ्यासाचीही गोडी निर्माण केली. घरच्या लोकांनी मुलांच्या शिक्षणात आस्थेने सहभाग घ्यावा, यासाठी त्याने सात ते आठ या संध्याकाळच्या वेळात "अलार्म ऑन, टीव्ही ऑफ" ही योजना राबवली. मुलांचा रोज नेमका काय अभ्यास घ्यायचा, हे पालकांना मोबाइलमार्गे, आधीच नीट समजावून सांगून, ही अशक्य वाटणारी गोष्ट त्याने घराघरातून साध्य करून दाखवली आहे. सातचा भोंगा झाला की घरच्या मुलांच्या गृहपाठाचा तास सुरू होतो. घरातला टीव्ही बंद होतो, बहुतेक पालक तो नियम पाळतात. मुलांच्या अभ्यासात शिक्षकास हवे तेवढेच नेमके लक्ष घालतात, आणि आठला दुसऱ्या भोंग्यानंतर हा गृहपाठाचा तास संपतो. याने पालकही शाळेशी जोडले गेले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांमधून त्याचे नवनवीन प्रकल्प सुरू होतात, आणि त्यात शेवटी संपूर्ण गावाची प्रगती होत राहते. असाच एक प्रकल्प म्हणजे आसपासच्या झाडांचे क्षेत्रफळ मोजण्याचा प्रकल्प. त्यात टेप, दोर किंवा कासरा घेऊन, प्रत्यक्ष झाडांची त्रिज्या, परीघ मोजून गणित वापरले गेले. यानंतर गावाचे क्षेत्रफळ काय ते शोधायला तलाठ्याची मदत घेऊन, आपल्या भागातील वनाच्छादित क्षेत्र नेमके किती आहे, हे त्याच्या विद्यार्थ्यांनी मोजले. ते केवळ २६ % आहे, हे कळल्यामुळे ते ३३ टक्क्यांवर आणायला नवी झाडे लावतानाच ती टिकून राहावीत यासाठी त्यातील काही झाडांना क्यू आर कोडसारखा नंबर देऊन, त्यांना मेटल डिटेक्टर लावून, त्यांच्या संरक्षणाची जबाबदारीदेखील विद्यार्थ्यांवर कशी सोपवली ते ऐकताना त्याच्या हुशारीचे, जनसंपर्काचे आणि तंत्रज्ञानाचे भरपूर कौतुक वाटत राहते. या त्याच्या प्रकल्पाची दखल नॅशनल जिऑग्राफिकने घेतली, आणि आता तो जागतिक स्तरावर इतर शिक्षकांचा या बाबतीत प्रशिक्षक गणला जातो. या आणि अशा अनेक प्रकल्पांमधून त्याने आपल्या शाळेशी महाराष्ट्रातील, आणि भारतातीलच नव्हे, तर अवघ्या जगातील अनेक ठिकाणच्या शाळा जोडून घेतल्या आहेत. जवळपास ऐंशी जागतिक शाळांतील शिक्षकांशी त्याचे सततचे संपर्क आहेत. त्याच्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीचे शिक्षण तो देतो, त्यामुळे त्यांना पुढील आयुष्यात आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे आपणच कशी शोधून काढायची, त्याचे मूलग्राही शिक्षण मिळत जाते. ती मुलेमुली वैश्विक नागरिक व्हायला तयार होतात.
या वंद्य शिक्षकाबद्दल जितके समजले, तेवढ्यानेदेखील मी भारावून गेले. अजून तो खूप काही साध्य करून दाखवील, याबद्दल मला शंका नाही. पी. सावळाराम यांच्या गाण्याचे शब्द, "धागा, धागा, अखंड विणुया, विठ्ठल विठ्ठल मुखें म्हणूया" आपोआप मनात उमटले. खरोखर, या तरुण शिक्षकाने अक्षांशाचे, रेखांशाचे, उभे-आडवे धागे अशा काही कौशल्याने एकत्र विणलेत, की त्यातून अख्ख्या महाराष्ट्राला, अवघ्या भारताला आणि संपूर्ण जगालाच एका बंधुभावाच्या वस्त्राचे ऊबदार पांघरूण घातलेय, असे वाटते.

***

# आठवण

\- **भाग्यश्री बारलिंगे** (मेसा, ॲरिझोना)



(टेक्स्ट मेसेजचा आवाज)
टेक्स्ट मेसेज.... शब्दांचं आकुंचित जग
दाटीवाटीनं अनेक अक्षरं
अधीर अशी
इलेक्ट्रॉनिक घोड्यावर स्वार
LOL, OMG, IMHO...
भावनांचा फुलोरा ? वेळ कुणाला ?
लगेच उत्तर मिळतं...
LOL, OMG, IMHO... !

आठवतात मला
तू लिहिलेली अनेक-पानी पत्रे !
विचारांच्या कोषातून
शब्दांची फुलपाखरे सोडवत,
त्यांना अक्षरात पकडून,
काळजीपूर्वक लिहिलेली पत्रे ।

काळाच्या अखंड, नीरस भिंतीवर
उजळलेला कोनाडा निर्माण करणारी पत्रे !
क्षणात न मिळता
युगांनी मिळणारी;
आतुरतेचे पोस्टेज लावलेली पत्रे ।

मला आठवते तू-
पत्राची वाट पाहणारी,
उचंबळणाऱ्या भावनांना लगाम घालणारी,
पत्र वाचताना गहिवरणारी ।

आता सगळंच virtual !
हसणे, रडणे, आलिंगने आणि चुंबने !
मला तुझी आठवण येते
या LOL, OMG, IMHO...जगाला
शब्दांची रीत शिकवायला
एकदा तरी मला पत्र लिही,
तुझा-माझा श्वास एक असला तरी !

***

## 'लेखक तुमच्या भेटीला'

**भाग ४:- शनिवार, डिसेंबर १९, २०२० सकाळी ११-११:३० CST वाजता प्रसारित झाला.** 'मृत्युंजयकार' शिवाजी सावंत यांची सिअॅटल, वॉशिंग्टन स्थित कन्या कादंबिनी धारप हिच्याशी तिचा कविता संग्रह 'किनारा होऊन आपणच' आणि वडिलांच्या श्रीकृष्ण जीवनावर आधारित 'युगंधर' या प्रख्यात कादंबरीचा तिने केलेला इंग्रजी अनुवाद याविषयी सोना भिडे यांनी संवाद साधला. पुन:प्रसारण - https://youtu.be/HJSOJCUQm_4

**भाग ५:- शनिवार जानेवारी २३, २०२१, सकाळी ११-११:३० CST-** वॉशिंग्टन डी सी येथील लेखिका **प्रगती कोलगे** यांच्याशी - बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य **शिल्पा कुलकर्णी** संवाद साधतील. कार्यक्रमाचे प्रसारण :- बृ. म. मंडळ फेसबुक व यूट्युबवर.

**टीप:-** 'लेखक तुमच्या भेटीला' या ऑनलाईन उपक्रमात आपले लेखन सादर करण्यास इच्छुक लेखकांनी खालील ईमेल-पत्त्यावर संपर्क करावा. **author@bmmonline.org** .

***

## वेध प्रकाशाचे

- **मंजिरी जोशी** ( कोपेल, टेक्सास)



२०२० या वर्षाच्या कोविड विषाणूच्या महामारीच्या वातावरणातील प्रवासात काही टप्प्यांवर सुचलेल्या ह्या चारोळ्या.

आयुष्याच्या गणितात
सगळंच प्रमाण कसं व्यस्त?
माणुसकी इथे महाग
आणि मरण झालंय स्वस्त!

एवढ्याशा विषाणूने
जगभर घातलं थैमान
गरज कोणती, कोणती चैन
याचं थोडंसं आलंय भान !

अंधाऱ्या भुयारात चालून चालून
वीसशे वीसने आता घेतलाय विसावा,
नव्या वर्षाची चाहूल लागताच
भुयाराच्या मुखाशी प्रकाश दिसावा!

***

## बृ. म. मंडळ यू ट्युब विभाग

कविता- वेध प्रकाशाचे: लेखन व वाचन- मंजिरी जोशी: यू ट्युब-संकेतस्थळ:
https://youtu.be/zq9DCqGiiJ8

## विश्व मराठी संमेलन २८-३१ जानेवारी २०२१ - (ऑनलाईन)

**- आयोजन प्रमुख, विश्वमराठी संमेलन २०२१ (ऑनलाईन)**

विश्व मराठी परिषदेने (www.vishwamarathiparishad.org) विश्व मराठी संमेलन २०२१ चे ऑनलाईन पद्धतीने आयोजन केले आहे. सुमारे ३५ देशातील महाराष्ट्र मंडळे, बृहन्महाराष्ट्र मंडळ (उत्तर अमेरिका), महाराष्ट्रातील महाविद्यालये, वाचनालये आणि मराठी भाषकांच्या संस्था या संमेलनामध्ये सहभागी झाल्या आहेत. साहित्य, संस्कृती, उद्योजकता आणि युवा अशा चार विभागांनुसार चार दिवसांच्या संमेलनात पहिल्या दिवशी विश्व मराठी साहित्य संमेलन, दुसऱ्या दिवशी विश्व मराठी सांस्कृतिक संमेलन, तिसऱ्या दिवशी विश्व मराठी उद्योजकता संमेलन आणि चौथ्या दिवशी विश्व मराठी युवा संमेलन असे संमेलनाचे स्वरूप आहे. हे संमेलन यू-ट्युबवर लाईव्ह होणार आहे. सक्षम, संपन्न आणि समृद्ध वैश्विक मराठी भाषक समाज असे भव्य स्वप्न विश्व मराठी परिषद पहात असून त्या ध्येयपूर्तीच्या दिशेने एक पाऊल म्हणून या विश्व मराठी ऑनलाईन संमेलनाचे आयोजन केले आहे.

संमेलनामध्ये उद्घाटन, अध्यक्षीय संबोधन, प्रमुख पाहुण्यांचे मनोगत, परिसंवाद आणि चर्चा अशी बौद्धिक मेजवानी असून दररोज संध्याकाळी विविध देशातून सादर केले जाणारे सांस्कृतिक कार्यक्रम प्रदर्शित केले जाणार आहेत. तसेच कवीकट्टा, कथाकट्टा, आयडिया कट्टा, संस्कार संस्कृती कट्टा, युवा कट्टा, वडिलधारे कट्टा आणि शेतकरी कट्टा असे विविध प्रकारच्या कट्टा – उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वैश्विक प्रतिभा संगम असेही याचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. तसेच विविध प्रकारची पुस्तके ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध करून दिली जाणार आहेत. याचबरोबर "वैश्विक राजकीय पटलावर मराठी माणसाची नाममुद्रा", विदेशातील भारतीय दूतावासामध्ये कार्य करणा-या अधिका-यांची मनोगतं, वैयक्तिक पातळीवर उत्तुंग कार्य करणा-या मराठी बंधु-भगिनींचा "पताका पराक्रमाची" हा कार्यक्रम आणि विविध देशातील मराठी बांधवांनी जपलेल्या महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन अशा कार्यक्रमांची संमेलनामध्ये रेलचेल आहे.

या ऑनलाईन विश्व मराठी संमेलनाच्या निमित्ताने एक आगळीवेगळी संकल्पना राबवली जात आहे. एका अध्यक्षाऐवजी विविध क्षेत्रातील ९ प्रतिभावान व्यक्तींचे अध्यक्षीय मंडळ तयार करण्यात आले आहे. या अध्यक्षीय मंडळाचे प्रमुख म्हणजे महासंमेलनाध्यक्ष पद डॉ. अनिल काकोडकर हे भूषवणार आहेत. त्याचबरोबर, **साहित्य** संमेलनाध्यक्ष - भारत सासणे, पुणे आणि डॉ. विनता कुलकर्णी, शिकागो, **संस्कृती** संमेलनाध्यक्ष - सयाजी शिंदे आणि रश्मी गावंडे, फ्रँकफर्ट, **उद्योजक** संमेलनाध्यक्ष - डॉ. प्रमोद चौधरी आणि मृणाल पंडित-कुलकर्णी, लंडन आणि **युवा** संमेलनाध्यक्ष - उमेश झिरपे व अजित रानडे जर्मनी हे करतील. या संमेलनाच्या महास्वागताध्यक्षा लोकसभेच्या माजी सभापती आदरणीय सुमित्राताई महाजन असून महासंरक्षक म्हणून डॉ. विद्या जोशी अध्यक्ष बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका यांचा सहयोग आहे.

या संमेलनासाठी नोंदणी नि:शुल्क आहे. नोंदणी करण्यासाठी संकेतस्थळ-www.vishwamarathiparishad.org/sammelan-nondani नोंदणी करणाऱ्या प्रत्येकाला एक महिनाभर मोफत ऑडिओ बुक्स ऐकता येणार आहेत. आणि काही दर्जेदार पुस्तके ई-बुक स्वरुपात मोफत डाउनलोड करता येणार आहेत. संमेलनातील उपक्रमांसंबंधी माहिती व दैनंदिन कार्यक्रमांची रूपरेषा www.sammelan.vmparishad.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सर्व मराठी भाषक बांधवांनी एकमेकांना सहकार्य करावे आणि सर्वांनी प्रगती करावी असे संमेलनाचे उद्दिष्ट आहे. उत्तरअमेरिकेतील मराठी भाषक बांधवांना या ऑनलाईन विश्व मराठी संमेलनासाठी आग्रहाचे आमंत्रण!

धन्यवाद!

***

## अमेरिकेतील दिवाळी "२०२०"- किल्ला स्पर्धा

**-गौरी करंदीकर** (ब्लूमिंग्टन, इलिनॉय)



दिवाळी म्हटलं, की जसे फराळ, फटाके, पणत्या, आकाशकंदील डोळ्यांपुढे येतात, तसेच अंगणातील किल्लाही आठवतो. दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा ही आपल्या पूर्वजांनी आपल्या गौरवशाली इतिहासाच्या जवळ जाण्यासाठी निर्माण केलेली एक संधी आहे. या परंपरेतूनच गडकोटांविषयी प्रेम वाढते, पुढे दुर्गभ्रमंतीची आवड जडते.

भारताबाहेर रहाणाऱ्या बाळगोपाळांना या परंपरेची आणि गौरवशाली इतिहासाची ओळख व्हावी या हेतूने यंदा पिट्सबर्ग सिनेरसिक, टेनसी मराठी मंडळ, ब्लूमिंग्टन् मराठी मंडळ, शार्लट मराठी मंडळ, सावली एंटरटेनमेंट, यु के मराठी मंडळ यांनी एकत्र येऊन "दिवाळी किल्ला " स्पर्धेचे आयोजन केले होते. आनंदाची गोष्ट म्हणजे स्पर्धेला भरभरून प्रतिसाद मिळाला.

खरं तर सध्या कडाक्याची थंडी चालू आहे पण मुलांनी कोट - टोपी चढवून, घराबाहेर जाऊन माती/दगड आणून किल्ला बनवला. काही मुलांनी कागदाचा किल्ला बनवला तर एका ग्रुपने चक्क लेगो ब्लॉक खेळण्याचा किल्लादेखील बनवला.

मुलांची कल्पकता आणि उत्साह पाहून सर्वचजण अवाक झाले. मुलांनी नुसता किल्ला केला नाही, तर त्या किल्ल्याचा इतिहास, भौगोलिक रचना याबद्दलदेखील महत्वपूर्ण माहिती जमवली आणि किल्ल्याद्वारे ती जिवंत केली.

पुण्याचे इतिहासाचे अध्यापक आणि इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन शेटे सर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सरांनी योग्य परीक्षण तर केलेच पण ज्या मुलांनी किल्ला फक्त गोष्टीमध्ये किंवा चित्रात पाहिला आहे त्यांनी बनवलेले रायगड, जंजिरा, सिंहगड, सिंधुदुर्ग किल्ले पाहून भरभरून कौतुक केले. स्पर्धेत शार्लट आणि टेनसी मंडळाच्या स्पर्धकांनी बाजी मारली. पण सरांनी नमूद केले, की सगळेच किल्ले खूप सुंदर होते त्या मुळे विजेता ठरवणे फार कठीण गेले.

https://www.facebook.com/KilleSpardha2020 या फेसबुक पेजवर सर्व स्पर्धकांच्या किल्ल्याचे 'virtual exhibition' पहायला मिळेल, या पेजला जरूर भेट द्या. मुलांनी किल्ला तर छान केलाच आहे पण त्या बरोबर केलेली कॉमेंट्री - निवेदन पण ऐकण्यासारखं झालं आहे.

५ डिसेंबर रोजी पारितोषिक वितरण समारंभ ऑनलाईन संपन्न झाला, या समारंभात परीक्षक शेटे सरांचे "किल्ले आपल्याला काय शिकवतात?" हे सांगणारे अतिशय प्रभावी व्याख्यान झाले. **पुढच्या वर्षी आणखी जास्त प्रतिसाद मिळेल आणि इतर मंडळेही या उपक्रमात सहभागी होतील अशी खात्री** बाळगून कार्यक्रमाची सांगता झाली.


किल्ला स्पर्धेच्या आयोजनात श्री. राहुल देशमुख (पिट्सबर्ग सिनेरसिक), श्री. संदिप पवार (शार्लट मंडळ), श्री. प्रमोद पाटील (सावली एंटरटेनमेंट), सौ. पूनम शिरवळकर (टेनसी मंडळ), सौ. गौरी करंदीकर (ब्लूमिंग्टन मंडळ), सौ. योगिता पाटील सेन - (UK मराठी मंडळ) यांचे सहकार्य लाभले.

***

## "मॅग्नोलिया" - पुस्तक परिचय

**-विनता कुलकर्णी** (शिकागो)

अमेरिकेत प्रिन्स्टन न्यू जर्सी येथे आणि भारतात (पुणे, मुंबई परिसरात) असे दोन्ही देशात आलटून पालटून वास्तव्यास असलेल्या **अनिता कुलकर्णी** यांचे "मॅग्नोलिया"- 'मनस्वी द्विखंडीय प्रवासातली कलंदर कलाकारी' - हे पुस्तक फेब्रुवारी २०१८मधे मेहता पब्लिशिंग हाउस (पुणे) यांनी प्रकाशित केले.




अनिता कुलकर्णी वास्तुविशारद असून त्यांनी मुंबईतील सर जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथून बी. आर्च आणि अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ मॅसॅच्युसेट्स येथून लँडस्केप आर्किटेक्चरमधे मास्टर्स-पदवी-शिक्षण घेतले आहे.

वास्तुशास्त्राचे अध्यापन, लेखन, मराठी ललित लेखनपर दोन पुस्तके, इंग्रजी कविता-संग्रह प्रकाशित, शास्त्रीय संगीताचा व्यासंग व तीन सीडीज प्रकाशित, दोन नृत्य-संगीत कार्यक्रमांची निर्मिती व दिग्दर्शन, भारतीय नृत्य-संगीतास जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने भारत व अमेरिकेत 'रेणू आर्ट फाऊंडेशन' संस्थेची स्थापना असे त्यांचे बहुआयामी कर्तृत्व आणि व्यक्तिमत्व आहे. 'मॅग्नोलिया' पुस्तकातील पानापानांतून त्यांची रसिकता आणि संवेदनशीलता वाचकांना जाणवते. मात्र हे पुस्तक जरा वेगळ्या शैलीतील आत्मकथन आहे.

पांढरेशुभ्र 'मॅग्नोलिया' फूल हे सौंदर्य, आनंद आणि शांतीचे प्रतीक! याच प्रतीकांचा आपल्या जीवनप्रवासात लेखिकेलाही ध्यास असल्याचे पुस्तक वाचतांना प्रकर्षाने जाणवते. लेखिकेच्या आयुष्यातील वैयक्तिक, कौटुंबिक तपशील, आपली जडणघडण कशी झाली इत्यादी या पुस्तकात अजिबात वाचायला मिळणार नाही. परंतु, 'अमूर्त परिचय', 'बॉस्टन ब्रह्मिन्सचा सत्संग', 'ॲमहर्स्टची वर्षं', 'इंद्रधनुषी शक्यतांचा कॅनव्हास', 'प्रसन्नतेचा परीसस्पर्श', 'भटकंत्या', 'मैत्र', 'कलंदरी' अशा आठ भागांमध्ये विविध ललित लेखांतून आत्मपरतेचा एक धागा पुस्तकात गुंफलेला दिसतो. आणि त्यांद्वारे, अनिता कुलकर्णी यांच्याच शब्दांत सांगायचे तर, व्यवसायातील आणि एकंदर जगण्यातील आध्यात्मिक, बौद्धिक, भावनिक आणि भौतिक पातळीवरील अनुभवांची स्मृतिचित्रे, निसर्गरूपे, व्यक्तिचित्रणे, कामाच्या निमित्ताने किंवा आवड म्हणून केलेल्या प्रवासांची वर्णने, वास्तुविशारद म्हणून केलेल्या कामाच्या काही प्रकल्पांबद्दल माहिती... असं बरंच

या आत्मकथनात सामावलं आहे.

कुणां परिचित दांपत्याच्या परिस्थितीजन्य समस्येकडे पाहून, "आजूबाजूच्या संधींची चमचम पसरलेली असताना एखादी उचलून तिचं सोनं करणं वेगळं, आणि या खडकाळ माळावर कुठे मातीखाली एखादा कण चमकतोय का, ते श्रम करुन शोधणं वेगळं" असं समंजस अवलोकन, "आत दुःखाची बेगमी असते, तेव्हा बाहेर आनंद पसरतो", "आपल्या कुडीतल्या मूठभर हृदयाची क्षमता अफाट अफाट असते"...

इत्यादी विधानांतून लेखिकेची **जगाकडे पाहण्याची संवेदनशील, रसिक वृत्ती** मार्मिक सत्य, अनुभवातून आलेलं शहाणपण, आणि लेखिकेचा आत्मविश्वासही व्यक्त झाला आहे. एकंदरित **'मॅग्नोलिया' हे पुस्तक म्हणजे वास्तुविशारद अनिता कुलकर्णी यांच्या समरसून जगण्यातील** आठवणी, अनुभव, चिंतन यांचा सुंदर शब्दचित्रपट !

**मॅग्नोलिया'- अनिता कुलकर्णी**
**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
**पृष्ठे- २४६, मूल्य- २९५ रुपये**

***

# एक दाता : पेरसिमन गाथा

**- हेमा शेंडे** (सांता रोसा, कॅलिफोर्निया)



कांही वर्षांपूर्वी आम्ही आमचे शिकागो उपनगरातील घर (तोट्यात) विकून कॅलिफोर्नियात आलो आणि येथल्या सांता रोसा ह्या वाईन कौन्टी मधल्या भागांत घर बघू लागलो. हा भाग त्यावेळी आर्थिक मंदीमधून बाहेर येऊं पाहत होता.आमची घराबद्दलची मुख्य अट म्हणजे आमच्या मुलीच्या घरापासून १०/१५ मैलांच्या परिघात घर असावे. आम्हाला छोटंच घर हवं होतं. त्यावेळी बघितलेल्या घरांत ह्या घराने (आमचे सध्याचे घर) आमच्या बऱ्याचशा अपेक्षा पूर्ण केल्या होत्या आणि मुख्य म्हणजे घर ट्रस्ट अकाउंट मध्ये होतं आणि वकिलाला लवकर हातावेगळं करायचं होतं; तेव्हा आम्ही मागणी केली होती, त्या किंमतीला आम्हाला ते घर बिनतक्रार मिळालं. आम्ही मूळ घरांत अगदी भिंती जरी पाडल्या नाहीत, तरी पुष्कळ फेरबदल करून घेतले. आमच्या घराची घरातली आखणी व बागेचा आराखडा , घराची भरपूर उजेडाची मोक्याची जागा (location), ह्या बाबतीत आम्ही ( कधी नव्हे ते) नशीबवान ठरलो. ह्यातली एक महत्वाची गोष्ट म्हणजे फळसंपत्ती!

बागेत पुढच्या दारी मेयर लेमन (Mayer lemon) चं एक छोटे पण जवळजवळ वर्षभर फळ देणारे समृद्ध झाड आणि त्याच्यापासून थोड्या अंतरावरचा फुयु पेरसिमन (Fuyu persimmon)चा वृक्षही असावेत अशी थोडीच मागणी वा अपेक्षा केली होती ? पण ती मिळाली आणि आमचे जीवन सुफलित करून गेली. त्यानंतर आम्ही बागेत पीच, मॅन्डरीन ऑरेंज व सफरचंद अशी छोट्या चणीची (dwarf ) झाडे लावली आहेत. त्यापैकी ४ फुटांच्या पीचच्या झाडाला प्रतिवर्षी अधिक अशी फळे लागतात. शिकागोत फळझाडे म्हणजे सफरचंद व चेरी अशी असायची. येथल्या घरांतल्या बागेत ऍप्रिकॉट,पीच, लेमॉन्स,प्लम, चेरी अशीही असतात. त्यातच कुणाकडे येथल्या लुथर बरबँकने निर्माण केलेला सांता रोसा प्लम हाही असतो. ही सर्व झाडे अमाप फळे देतात.

"अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने", ह्या ओळी आमच्या पेरसिमनच्या बाबतीत अगदी खऱ्या आहेत. येथे 'दो कराने' म्हणण्याऐवजी मित्रमंडळींचे हात, त्यांच्या व आमच्या नातवंडांचे हात, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचे हात, घराच्या बाजूने येणाऱ्याजाणाऱ्यांपैकी फळ आवडणाऱ्यांचे हात अशी सर्वांची वर्णी लावली पाहिजे. त्याखेरीज अगदी वरच्या टोकाच्या फांद्यांवरची फळे खाणारा पक्षीवर्गही सुखी ठेवण्याचे काम हा वृक्ष करतो. एवढ्या सगळ्यांना वाटूनही उरणारी फळे मी डेंटिस्टच्या ऑफिसमध्ये, आमच्या चर्चावर्गात देते. ह्या वर्षी एका मैत्रिणीबरोबर फूड पॅन्टरीमध्येही द्यायचा माझा मानस आहे.

पेरसिमन चे वनस्पतिशास्त्रातील नांव Diospyros kaki असे आहे. ह्या प्रकारचा पेरसिमन हा आशियाई देशातून म्हणजे चीन, जपानहून आला आहे. दुसऱ्या प्रकारचा पेरसिमन Diospyros Virginian हा अमेरिकेतला आहे व ह्याची चव गोड असली तरी फळ छोटे असते. आशियाई पेरसिमनमध्ये दोन प्रकार आहेत. एक फुयु व दुसरा हचिया ! त्यापैकी फुयु हा बसकट गोल, छोट्या भोपळ्यासारखा असतो व हचिया हंड्याच्या आकाराचा व फुयुच्या मानाने जरा मोठा असतो. फुयुची चव छान असते, परंतु हचिया अगदी पूर्ण पिकण्याआधी खाल्ला तर फार तुरट लागतो व त्यातल्या टॅनिनच्या मोठ्या प्रमाणामुळे तोंडाला तोठरा बसतो. हा प्रथम खाऊन बघितल्यामुळे कित्येक लोकांनी फुयु पण खाण्याचे धाडस केले नाही. पेरसिमन साधारण पिवळसर झाला कीं सफरचंद - सारखा खाता येतो. तो जसा पिकतो तशी त्याच्यावर केशरी/ तांबडी आभा पसरते आणि तो अत्यंत लोभस केशरी रंगाचा होतो. ह्या फळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ह्याच्यात क्वचितच बिया असतात. १०० फळांत केवळ एकातदुसऱ्यातच बी सांपडते. पेरसिमनची लागवड हवामान पट्टा ५-९ मध्ये होऊ शकते. कॅलिफोर्निया खेरीज टेक्सास व इतरही दक्षिण राज्यात हा वृक्ष वाढू शकतो. भारतांत पंजाब, हिमाचल प्रदेश, काश्मीरमध्ये ह्या फळाची लागवड करतात. पेरसिमनमध्ये पोटॅशियम व मँगनीजचे प्रमाण अधिक प्रमाणांत असते. कॅलरीज नसल्यामुळे हे फळ जास्त प्रमाणात खाता येते. फुयु पेरसिमन खाद्याच्या विविध प्रकारांत वापरता येतो. सलाड व सिरिअल्स खेरीज केक व कूकीजमध्ये त्याचा उपयोग होतो. अलिकडे एका भारतीय मुलीने मला पेरसिमनची साखरेशिवाय केलेली मिठाई, दिली होती. पेरसिमनचे काप करून डीहायड्रेटरमध्ये वाळवून पेरसिमन पोळी करून वर्षभर आस्वाद घेणे शक्य होतं.

ह्या झाडाला जून महिन्यात पांढरी बारीक फुले येतात. पुढे भरपूर प्रमाणात छोटी-छोटी हिरवी फळे लागतात आणि तितक्याच प्रमाणात गळतात. पण हे बघून ह्या वर्षी फळ अगदीच कमी येणार असा विचार केला तर फळाला इतका बहर येतो, की आपल्यावरचा स्वतःचाच विश्वास ढळतो. दरवर्षी एकाला एक लागून इतके गुच्छ लटकतात कीं फांद्या मोडू नयेत म्हणून त्यांना बांबूचे आधार लावावे लागतात. फळ साधारण ऑक्टोबरमध्ये पिकायला लागते आणि जानेवारी शेवटपर्यंत बहराची मजा घेता येते.

ह्या वर्षी असेच झाले. जुलै-ऑगस्टमध्ये इतकी फळे

गळाली, की झाडाखाली हिरवा गालिचा घातल्यासारखा वाटावा; आणि मग ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये फळे पिकायला लागली तेंव्हा पानांच्या आड इतकी फळे दडली होती, की मी सकाळी वा संध्याकाळी वर्दळीच्या-वेळी फळे काढायचे टाळले. मी लंच संपवून दुपारी जेंव्हा फारशी वर्दळ नसायची तेंव्हाच फळे काढत असे. आमच्या मित्रांच्या मते बहर पुष्कळ होता. परंतु माझा त्यावर विश्वास नव्हता. त्यानंतर डिसेंबरमध्ये पुष्कळ वारा येऊन सर्व पाने गळाली आणि मला हे फांद्या-फांद्यांना लगडलेले केशरी गोलक दिसले, तेंव्हा मला फळ पुष्कळ असल्याची ग्वाही मिळाली.



बहराच्या दिवसांत हे केशरी पीक आमच्या जीवनावर हक्क बाळगून असतं. ह्या दिवसांत कांही लोक घंटी वाजवून येऊन आपलेपणाने मला थोडे पेरसिमन्स मागतात. एके दिवशी मी फळे तोडत असतांना, एक बाई जोरात, म्हणजे आमच्या वसाहतीच्या मानाने, अधिक वेगाने आमच्या घरासमोरून गाडी चालवत पुढे गेली; मी फळे तोडत असल्याचे जेंव्हा तिच्या लक्षांत आलं, तेंव्हा तितक्याच जोराने गाडी मागे घेऊन आली आणि मला म्हणाली "give me $five worth, I love them! ती काय म्हणते आहे हे जेंव्हा माझ्या ध्यानात आलं तेंव्हा मी म्हटले, These are not for sale. I will give you a few! मग पेरसिमन घेऊन ती परत वेगानेच निघून गेली.

दुसऱ्या एकीने माझ्या पत्राच्या पेटीत चिठ्ठी ठेवली. त्यात तिने लिहिले की- मी (अस्मादिक) फळ काढू शकत नसले तर ती स्वतः काढून घेऊन त्यांची काळजी घेईल". माझ्या नशिबाने तिने स्वतःचा फोन नंबर दिला होता. तिला बोलवून चांगली ३५-४० पेरसिमन्स देऊन तिची रवानगी केली. ती तिच्या शेजाऱ्यांसकट त्यांच्या गाडीच्या ट्रंकमध्ये फळ भरायच्या तयारीनेच आली होती. माझ्या नशिबाने माझा नातू, माझी भाची व तिचा नवरा व त्यांची मुले ह्या सगळ्यांना ही फळे मनापासून आवडतात, त्यामुळे मला ह्या उदंड फळ देणाऱ्या वृक्षाचा बहर सार्थकी लागतो असे वाटते.

आता जानेवारीमध्ये फळे संपली, की फ्रीझरमध्ये ठेवलेल्या पेरसिमन्सच्या रसाचा उपयोग करून कूकीज व पेरसिमन- ब्रेड करायची तयारी ठेवली आहे.

जय पेरसिमन ! तुझ्या जीवावर मी उदार !

***

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
**संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
**फोन क्र.** 1-216-926-6696 **ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी -** अध्यक्षा, बृ. म. मंडळ
**फोन क्र.** 1-224-321-2948 ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

.................................................................................

## उत्तररंग व्याख्यानमाला - सत्र क्र. ३४

**- स्मिता कंटक** (विल्मिंग्टन, डेलावेअर)





या सत्रात तीन विषय सादर करण्यात आले. पहिल्या भागात **डॉ. मोहन दुर्वे** (ॲलर्जीतज्ज्ञ) यांनी रेड वाईनसंबंधी माहिती दिली. डॉ. दुर्वे क्लिव्हलँड, ओहायो येथील केस वेस्टर्न रिझर्व्ह युनिव्हर्सिटीत अध्यापन करतात.

रेड वाईनचा इतिहास: ख्रिस्तपूर्व तीन हजार वर्षांच्या काळात कॅस्पियन समुद्राजवळच्या प्रदेशात रेड वाईन प्रथम वापरली गेली. इजिप्शियन, ग्रीक, रोमन संस्कृतीत व बायबलमध्येही रेड वाईनच्या वापराचे उल्लेख आढळतात. हवेच्या संपर्कामुळे वाईनवर बॅक्टेरियांचा परिणाम होत असल्यामुळे ती काळजीपूर्वक साठवण्याची आवश्यकता असते, असे एकोणिसाव्या शतकात लुई पाश्चर यांच्या संशोधनाने सिद्ध केले. याच सुमारास औद्योगिक क्रांतीमुळे नवीन यंत्रांच्या वापराने, द्राक्षांच्या लागवडीत सुधारणा झाली आणि वाईनचे उत्पादन वाढून मोठा व्यापार सुरू झाला.

रेड वाईनचे फायदे: रेड वाईन हृदयासाठी उपयुक्त असल्याचे समजले जाते. रेड वाईनमध्ये इतर शीतपेयांपेक्षा कमी कॅलरीज असतात. कोलेस्टेरॉल, फॅट्स आणि सोडियम यांच्या अभावामुळे ती किडनीला अपाय करत नाही. रेड वाईन अन्नमार्गातील क्षारांचे शोषण वाढवते. रेड वाईनमध्ये सॅलिसिलिक ॲसिड, रेसव्हेरेट्रॉल, ॲंटिऑक्सिडंट्स आणि फ्लॅव्हेनॉइड्स असतात. फ्लॅव्हेनॉइड्स हे विषाणूरोधक, ॲलर्जीरोधक, कॅन्सररोधक मानले जातात. रेड वाईनच्या सढळ वापरामुळे फ्रेंच लोकांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण अतिशय कमी आहे असा निष्कर्ष फ्रेंच आहाराच्या अभ्यासातून काढण्यात आला आहे.

रेड वाईनचे दुष्परिणाम: रेड वाईनमध्ये सल्फाइट्स् ही घातक रसायने असतात. पण आजकाल त्यांचे प्रमाण कमी करण्यात आले आहे. रेड वाईनमुळे मायग्रेन या प्रकारची डोकेदुखी होऊ शकते. याशिवाय अल्कोहोलचे इतर सर्व दुष्परिणाम होऊ शकतात. वाईन हे पेय सौम्य समजले जाते. किती प्रमाणात व किती वेगाने पेय घेतले, त्याबरोबर अन्न घेतले का, व्यक्ती पुरुष की स्त्री, व्यक्तीचे वजन यावर रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण अवलंबून असते. पुरुष व जास्त वजनाच्या व्यक्तींवर वाईनचा दुष्परिणाम कमी होतो. रिकाम्या पोटी वाईन घेतल्याने रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण वाढते. एकूण लोकसंख्येपैकी ३६% लोक न पिणारे, ७% क्वचित पिणारे, ३०% कमी प्रमाणात पिणारे, ११% नेहमी पिणारे, १६% भरपूर पिणारे अशी आकडेवारी उपलब्ध आहे. रक्तातील अल्कोहोलच्या वाढत्या प्रमाणाबरोबर सुरुवातीला मन उत्तेजित झाले, तरी हळूहळू मज्जासंस्था मंद होते. त्यामुळे दृष्टी मंद होते, निर्णय घेणे कठीण होते, रक्तातील अल्कोहोलच्या वाढत्या पातळीमुळे ड्राइव्हिंग करण्याची क्षमता कमी होत जाते.

डॉ. दुर्वे यांनी श्रोत्यांना सल्ला दिला, की रक्तातील अल्कोहोलची

पातळी ०.०८ असताना ड्राइव्हिंग करणे हे टेक्स्टिंग करत किंवा सेलफोनवर बोलत ड्राइव्हिंग करण्यासारखे असते. त्यामुळे अल्कोहोलच्या अंमलाखाली असताना ड्राइव्हिंग करू नये. माफक प्रमाणात रेड वाईन घेणे घातक नसले, तरी ती सवय नसल्यास सुरू न करणे उत्तम, असे त्यांनी सांगितले. यानंतर त्यांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.



या व्याख्यानानंतर **विश्वेशा देशपांडे** यांनी उत्तम दर्जाची छायाचित्रे काढण्यासाठी प्रकाशयोजना कशी करावी याबद्दल थोडक्यात मार्गदर्शन केले. विश्वेशा देशपांडे या क्लीव्हलँड, ओहायो येथे राहतात, आणि फोटोग्राफी हा त्यांचा आवडता छंद आहे. काही छायाचित्रांची उदाहरणे दाखवून त्यांनी याबाबतीत सूचना दिल्या.

सत्राच्या तिसऱ्या भागात **शीला सोगल** यांनी दोन लोकप्रिय इंडियन रेस्टॉरंट्स यशस्वीरीत्या चालवण्याचे आपले अनुभव सांगितले. क्लीव्हलँड, ओहायो शहरातले पहिले इंडियन रेस्टॉरंट 'सॅफ्रन पॅच' आणि त्याबरोबर स्नॅक्ससाठी मशहूर 'जयपूर जंक्शन' अशी दोन रेस्टॉरंट्स त्यांनी सुरू केली आणि अनेक वर्षे अतिशय उत्तमरीत्या चालवली. आता निवृत्तीनंतर त्या फ्लोरिडा राज्यात राहतात आणि निरनिराळे उत्तमोत्तम पदार्थ करून आप्तेष्टांना खिलवत असतात.



१९७८ मध्ये क्लीव्हलँडमध्ये आल्यावर, तिथे एकही इंडियन रेस्टॉरंट नाही हे लक्षात घेऊन शीलाताईंनी हा व्यवसाय करण्याचे ठरवले आणि पूर्वतयारी सुरू केली. पाच वर्षे निरनिराळ्या पदार्थांवर प्रयोग करून, वजने, मापे निश्चित करून पाककृती तयार केल्या. 'नॉनव्हेज' पाककृती शिकून घेऊन त्यांचा सराव केला. आपल्या रसायनशास्त्राच्या पदवीच्या जोडीला त्यांनी अमेरिकन कलिनरी स्कूलमध्ये जाऊन पाश्चिमात्य पाककृतींचे आणि रेस्टॉरंटचा व्यवसाय कसा उभा करावा याबद्दल प्रशिक्षण घेतले. त्यानंतर अनुभवासाठी त्यांनी पिझ्झा शॉपमध्ये काम केले. रात्री उशिरापर्यंत डेली शॉपच्या जागेत काम करून केटरिंगचा परवाना मिळवला. आपल्या व्यवसायाची जाहिरात व्हावी म्हणून त्या अल्पदरात ऑर्डर्स घेऊ लागल्या. त्यावेळी त्यांचे घोषवाक्य होते, "We tickle your palate but not your wallet."

शीलाताईंना त्यांचे पती डॉ. सोगल यांचा मोलाचा पाठिंबा आणि सहकार्य लाभले आणि डेली शॉपची छोटीशी जागा विकत घेऊन शीलाताईंनी 'सॅफ्रन पॅच' हे फॉर्मल रेस्टॉरंट उघडले. थोड्याच काळात ते लोकप्रिय झाल्यावर त्यांनी मोठी जागा विकत घेऊन तिथे ते सुरू केले. आपले घर आणि मुले सांभाळून, दिवसातले चौदा तास त्या पाच मदतनिसांसोबत रेस्टॉरंटचे काम सांभाळत असत. त्यांनी पारंपरिक पाककृती नाविन्यपूर्ण नावांसह लोकप्रिय केल्या, नवीन पाककृतींचे यशस्वी प्रयोगही केले. त्यांनी 'सॅफ्रन पॅच' या फॉर्मल रेस्टॉरंटनंतर तीन वर्षांनी स्नॅक्सप्रेमींसाठी 'जयपूर जंक्शन' हे दुसरे रेस्टॉरंट उघडले. जयपूर जंक्शनला भेट देणारे ग्राहक आनंदाने सुरेख अभिप्राय लिहून तिथली खास अभिप्रायांची भिंत भरून टाकत असत.

दोन्ही रेस्टॉरंटमध्ये काम करणाऱ्या वेटर्सना त्यांनी नेहमीच चांगली वागणूक दिली. वेटर्सना योग्य टिप मिळावी असा त्यांचा कटाक्ष होता. तंदूरसाठी परवानगी मिळवताना आलेल्या अडचणी, काही ग्राहकांना कडक शब्दांत दिलेली समज, मोठ्या प्रमाणावर घेतलेल्या ऑर्डर्स असे या काळातले अनेक अनुभव त्यांनी सांगितले. याबरोबरच रेस्टॉरंटमधले रोजचे काम कसे चालते, मेन्यू कसे ठरवले जातात, याबद्दल माहिती देऊन त्यांनी काही पाककृतींबद्दलही टिप्स दिल्या.

आपल्या आयुष्याकडे मागे वळून पाहताना शीलाताईंना लहानपणीचे, इंदूरच्या मोठ्या एकत्र कुटुंबातले वास्तव्य आठवले. मोठ्या प्रमाणात स्वयंपाक, सणावाराची पक्वाने पाहण्याचा तिथला अनुभव आठवला. वर्षभराचा शिधा विकत घेताना तो पारखून कसा घ्यावा याचे बाळकडू त्यांना आजोबांकडून मिळाले. समोरच्या व्यक्तीला जाणून घेण्याची कलाही त्या तिथेच शिकल्या. रेस्टॉरंटच्या ग्राहकांशी संवाद साधताना त्यांना या कलेचा पुरेपूर उपयोग झाला. त्यांच्या शब्दांत, ही "मुळे"-कुटुंबाच्या विद्यापीठाची पदवी. शीलाताईंच्या पाकसाधनेची सुरुवात रोजच्या साध्या स्वयंपाकाने झाली असली, तरी कमलाबाई ओगले, मंगला बर्वे यांची पुस्तके वाचून त्यांनी त्यात सुधारणा केल्या आणि मग स्वप्रयोगाला अपरिमित कष्टांची जोड देऊन ही भरारी घेतली.

शीलाताईंनी श्रोत्यांना सल्ला दिला, की व्यवसाय वाढवायचा असेल, तर सातत्याने, योग्य किंमतीत उत्तम दर्जा दिला पाहिजे. सत्राअखेर त्यांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

***

## पुरवणी - ई विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

**- लेख:- मराठी विश्व-क्लब ५५ची वार्षिक हॉलिडे पार्टी - राजन गडकरी** (माहवाह, न्यू जर्सी) - "सालाबाद प्रमाणे ह्याही वर्षी मराठी विश्व-क्लब ५५ च्या वार्षिक हॉलिडे पार्टीची वेळ आली. कार्यकारिणीचे सदस्य एकमेकांशी बोलायला लागले आणि मग मीटींग ठरली. शकुनने सर्वांना आमंत्रणं पाठवली. एक मोठा फरक; मीटींग होती झूमवर." ...**वाचण्यासाठी Click Here**

**- लेख:- चाफा फुलला! - शुभदा गतारे-कोरे** (ऑस्टिन, टेक्सास)
"चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी, काही केल्या फुलेना"... कवी बी यांचे हे लोकप्रिय गाणे गेले काही महिने माझ्या बागेतल्या खऱ्याखुऱ्या चाफ्याला उद्देशून मी गुणगुणत होते. त्याचे असे झाले, की"... **वाचण्यासाठी Click Here**

**- लेख:- पसायदानाचा शतशब्दथरार-**
**प्रियदर्शन मनोहर** (पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया)
"आज उगीचच मनात आलं, की कशाला आपण इतकं भरमसाठ लिहितो? जे आपल्याला सांगायचं आहे ते किती कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त समर्थपणे आपल्याला सांगता येईल? सुमारे ८०० वर्षांपूर्वी एका कवीने एका प्रार्थनारूपी कवितेतून साऱ्या विश्वात शांती, परस्पर प्रेम, स्वातंत्र्य, समाधान, भक्ती आणि सज्जनता नांदो अशी ईश्वराकडे विनवणी केलेली आहे. इतकी मोठी उदात्त वैश्विक विनंती करायला त्या कवीला मोजून फक्त शंभर शब्द लागले होते! कवी आहेत संत ज्ञानेश्वर आणि त्यांची कविता पसायदान! काय हा शतशब्दथरार! ह्या पसायदानाबद्दल मी शंभर शब्दांचे काही परिच्छेद लिहिले आहेत ".
**... वाचण्यासाठी Click Here, Or,**
**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

**- Yuva-Vani: Newsletter, January 2021:**
**Click: https://bmmonline.org/yuva-vani-archives/**

**- राशिभविष्य: जानेवारी २०२१ - दादा दामले** (न्यू जर्सी)
**Click: https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408





**Please contact Mansee Joshi at mjoshi1004@gmail.com . You can send the payment via Zelle/Quick Pay using this email address as recipient of funds. If you would like to pay by check, send an email for further details.**

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

- **VISITORS**
- **H-1 B VISA HOLDERS**
- **PERMANENT RESIDENTS**

**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**